# नियमीत दिवाणी मुकदमा क्र.४३८/२०१८ मधील
# निशाणी क्र.३८ वर आदेश
**CNR-MHLA110015042018**

---

१. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. तसेच पक्षकारांतर्फे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. सदरचा अर्ज वादीने अर्जात नमुद व्यक्तींना प्रतिवादी म्हणुन समाविष्ट करण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, प्रतिवादी क्र.१३ व १४ यांनी वादग्रस्त मिळकतीबाबत अर्जात नमुद व्यक्तींच्या नावे बेकायदेशीर खरेदीखताचे दस्त अस्तित्वात आणलेला आहे. तसेच सविता दत्तु सरवदे हीने देखील बेकायदेशीर खरेदीखताचे दस्त अस्तित्वात आणलेले आहे. त्यामुळे अर्जात नमुद व्यक्तींना प्रतिवादी म्हणुन समाविष्ट करणे आवश्यक आहे. सदर अर्जास प्रतिवादी क्र.४, ६ व ९ यांनी म्हणणे दाखल करुन तिव्र विरोध दर्शविलेला आहे. सदरचा दावा वादीने मिळकतीची वाटणी करुन मिळण्याकरिता व जाहीर करुन मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. त्यामुळे सदर दाव्याचे स्वरुप व पक्षकारांमधील वादाचे स्वरुप विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, प्रकरणामध्ये गुंतागूंत टाळण्याकरिता व प्रकरणाची संख्या टाळण्याकरिता अर्जात नमुद व्यक्तींना प्रतिवादी क्र.१७ ते २० म्हणुन समाविष्ट केल्यास ईतर प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच सदर प्रकरणातील दाव्याच्या स्वरुपावरुन व पक्षकारांमधील वादाच्या स्वरुपावरुन माझे असे मत

झाले आहे की, अर्जात नमुद व्यक्ती हे प्रकरणामध्ये आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. सबब, मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. नि.क्र.३८ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने अर्जात नमुद व्यक्तींना मुळ दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१७ ते २० म्हणुन समाविष्ट करुन दुरुस्त दाव्याची प्रत पुढील तारखेपर्यंत प्रकरणात दाखल करावी.

स्वा/–

दि. २१.०९.२०१९.

(शि. म. गौरगोंड)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, निलंगा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : M.N. Yenge |
| Name of the Court | : Jt. C.J.S.D Court<br>(Shivkant M. Gourgond) |
| Date of Judgment/Order | : 21.09.2019 |
| Judgment/Order signed by presiding officer | : 21.09.2019 |
| Judgment/Order uploaded on | : 23.09.2019 |